आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ एप्रिल २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर

- आगामी विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपाची पाच उमेदवारांची यादी जाहीर; राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवाराचं नाव आज जाहीर करणार

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान सुरू; दुपारी एक वाजेपर्यंत ६१ टक्क्यापेक्षा जास्त मतदान

**आणि**

- राज्यात उष्णतेची लाट, आतापर्यंत उष्माघात झालेल्या ५५ रुग्णांची नोंद

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात राज्यानं महत्त्वाकांक्षी पाऊल टाकत महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र  फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक झाली. या धोरणांतर्गत राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक होणार असून दीड लाखांपेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. राज्यभरात सहा एआय उत्कृष्टता केंद्रांची स्थापन होणार असून पाच एआय इनोव्हेशन शहरांची स्थापना करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. याशिवाय लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही या बैठकीत झाला. राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवडीकरता महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम हाती घेतली असून हरित महाराष्ट्र आयोगाची स्थापना केली जाणार आहे.

राज्यातल्या उच्च माध्यमिक परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. आता दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठ, परीक्षा बोर्ड, संस्थेला भरावे लागणारे शुल्क, प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, नोंदणी शुल्क, ग्रंथालय, नियतकालिकांसाठी, वैद्यकीय तपासणीसाठी शुल्क मिळणार आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या ९ जागांसाठीच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपाने पाच उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांचा समावेश आहे. भाजपाचे राष्ट्रीय महासचिव अरूण सिंह यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. १३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ९ जण निवृत्त होत आहेत. त्याआधी  १२ मे ला विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून आज अधिकृत नावाची घोषणा करण्यात येईल आणि उद्या उमेदवारी अर्ज भरला जाईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली. पक्षाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत राष्ट्रवादीच्या गाभा समितीची बैठक झाली, त्यानंतर तटकरे यांनी ही माहिती दिली. संख्याबळानुसार राष्ट्रवादीकडे एकच जागा असून योग्य उमेदवाराला संधी दिली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी विधान परिषदेची निवडणूक लढवण्याची इच्छा असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र याबाबत शिवसेनेबरोबर अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही, तसंच शिवसेनेकडूनही आपल्याला कोणतीही माहिती मिळालेली नाही, असंही बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

बीडमध्ये मस्साजोग गावात सरपंचपदाची पोटनिवडणूक काल झाली. आधीचे सरपंच संतोष देशमुख यांची २०२४ मध्ये हत्या झाल्यामुळे घेतलेल्या कालच्या पोटनिवडणुकीत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा  पराभव झाला आहे.  स्वरुपानंद देशमुख यांनी ९२ मतांनी त्यांचा पराभव केला. त्याआधीच्या निवडणूकीत संतोष देशमुख यांनी स्वरुपानंद देशमुख यांच्यावर अवघ्या दहा मतांनी विजय मिळवला होता.

**<><><><><>**

राज्यात लाईव्ह मनोरंजन क्षेत्राला चालना देण्यासाठी सरकारने लाईव्ह इव्हेंट्स परवानगीसाठी ‘एक खिडकी’ सुविधा निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात सर्वसमावेशक कार्यपद्धतीसह संपूर्ण कार्यान्वयासाठी समन्वय संस्था म्हणून माहिती आणि

जनसंपर्क महासंचालनालय कार्य करणार आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचं दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान आज सुरु आहे. राज्यातल्या सात जिल्ह्यांमधल्या १४२ मतदारसंघासाठी सकाळी सात वाजल्यापासून मतदान सुरु झालं.

दुपारी १ वाजेपर्यंत ६१ पूर्णांक ११ टक्के मतदान झालं होतं. सर्वात जास्त मतदान पूर्व वर्धमान जिल्ह्यात ६७ टक्के झालं तर सर्वात कमी मतदान उत्तर २४ परगण्यात झालं. दक्षिण २४ परगण्यातल्या फाल्ता मतदारसंघात भाजपाने पुन्हा मतदान घेण्याची मागणी केली आहे.

पश्चिम बंगालमधल्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात, आज मतदारांनी विक्रमी मतदान करावं असं आवाहन **प्रधानमंत्री नरेंद्र मोदी** यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे. विशेषतः महिला आणि युवावर्गाने मोठ्या संख्येने येऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा असं त्यांनी म्हटलं आहे. मतदारांनी मोठ्या संख्येने घराबाहेर पडून मतदान करावं असं आवाहन काँग्रेस अध्यक्ष **मल्लिकार्जुन खर्गे** यांनीही समाजमाध्यमावरुन केलं आहे. तरुण तसंच पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या मतदारांनी मतदान प्रक्रियेत सामिल होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा असं खर्गे म्हणाले.

तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तसंच भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांनी चक्राबेरिआ मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. सीपीएमचे राज्य सचिव मोहम्मद सलीम यांनी कोलकाता इथल्या मतदान केंद्रावर तर भाजपाचे नेते मिथुन चक्रवर्ती यांनी बेलगाछिया इथल्या मतदान केंद्रावर मतदान केलं.

मतदानाच्या या टप्प्यात ३ कोटी २० लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १ हजार ४४८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यात २२० महिलांचा समावेश आहे. मतदान शांततेत पार पडावं म्हणून सुरक्षा दलं तैनात आहेत. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे २ हजार ३२१ जवान बंदोबस्तावर आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त आयपीएस तसंच डब्ल्यूबीपीएस अधिकाऱ्यांचीही नियुक्ती केली आहे. काही तुरळक घटना वगळता मतदान शांततेत सुरु आहे.

**<><><><><>**

राज्यात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्यानं आरोग्य विभाग बारकाईने लक्ष ठेवून आहे. आतापर्यंत उष्माघात झालेल्या ५५ रुग्णांची नोंद झाली असून त्यापैकी ३८ रुग्ण एक मार्च ते २६ एप्रिल या कालावधीत आढळले आहेत. जिल्हानिहाय आकडेवारीनुसार, नंदुरबार जिल्ह्यात सर्वाधिक १४ रुग्ण आढळले आहेत. त्याखालोखाल नाशिकमध्ये ६, गडचिरोली आणि रत्नागिरी येथे प्रत्येकी ४, तर अहिल्यानगरमध्ये ३ रुग्णांची नोंद झाली आहे. रायगड, पुणे, पालघर, जालना, गोंदिया, बुलढाणा, चंद्रपूर आणि धुळे येथे प्रत्येकी २, तर अकोला, अमरावती, भंडारा, जळगाव, परभणी, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे जिल्ह्यांत प्रत्येकी १ रुग्ण आढळला आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशामधल्या हरदोई जिल्ह्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत ३६ कोटी २३० लाख रुपये खर्चाच्या ५९४ किलोमीटर लांबीच्या प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड गंगा द्रुतगती महामार्गाचं उद्घाटन आज झालं.

हजारो वर्षांपासून गंगा नदी उत्तर प्रदेशाची जीवनरेखा आहे, तसंच गंगा द्रुतगती महामार्गामुळे राज्याच्या विकासाची नवी जीवनरेखा ठरेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी महामार्गाच्या उद्घाटनानंतर हरदोई इथं घेतलेल्या सभेत केलं. या द्रुतगती महामार्गामुळे राज्यातील संपर्क व्यवस्थेत सुधारणा होईल. तसंच औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स, शेतीमालाची विक्री आणि प्रादेशिक समतोल विकासाला चालना मिळेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

- **- होल्ड बाईट प्रधानमंत्री - -**

उत्तर प्रदेश एक्सप्रेसवेज इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट प्राधिकरणानं विकसित केलेला हा महामार्ग राज्यातील पश्चिम, मध्य आणि पूर्व भागांना एकाच मार्गाने जोडणार आहे. हा राज्यातील सर्वात लांब एक्सप्रेसवे ठरणार आहे. सहा मार्गिका असलेला हा द्रुतगती महामार्ग १२ जिल्ह्यांतून जाणार असून मेरठ ते प्रयागराज हे अंतर अवघ्या ६ तासांत गाठता येणार आहे.

दरम्यान, आज सकाळी प्रधानमंत्र्यांनी वाराणसी इथं सकाळी १४ किमीचा रोड शो केला. त्यानंतर त्यांनी काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन विधीवत पूजा करत देशातील

नागरिकांना सुख-समृद्धी मिळावी अशी प्रार्थना केली. प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर हर हर महादेव असं लिहून काही फोटो शेअर केले आहेत. काशी विश्वनाथ मंदिरात जाण्याआधी प्रधानमंत्री मोदी यांनी रोड शो केला. यावेळी रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने उभ्या असलेल्या नागरिकांनी प्रधानमंत्र्यांचे स्वागत केलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे. मुंबईत वानखेडे मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

काल झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्जला ६ गडी राखून हरवलं. पंजाब संघाने निर्धारित २० षटकांत २२२ धावा केल्या होत्या. राजस्थानच्या संघाने विसाव्या षटकाचे चार चेंडू बाकी असताना ४ बाद २२८ धावा करत सामन्यात विजय मिळवला.

**//<><><><><>//**